**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०१**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -विनोद गंगाराम सोनारकर.

**<u>प्रतिवादीतर्फे प्रतिवादी क्र.१ विनोद यांचा सरतपास शपथेवर प्रतिवादी तर्फे श्री. एस.एन.पिंपळकर यांच्या मार्फत सुरू.</u>**

**१५.** माझे शपथपत्र नि. क्र.४४ मधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. मी खालील दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहे.

**i)** मी दि.०९ जुन १९६७ रोजीचे मुळ खरेदीखत अभिलेखावर दाखल केले आहे. सदर खरेदीखत माझ्या वडीलांच्या हक्कात गंगाधर गोविंदराव आनदेव यांनी करून दिलेले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर गंगाधर आनदेव यांची सही आहे त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला. सदर दस्तऐवजाला निशानी क्रमांक देण्यासाठी ॲड.पिपळकर यांनी सदर बाब पुढे खुली ठेवण्याची विनंती केली. सदर दस्तऐवजाला सिध्द केत्यानंतर त्यास निशानी क्रमांक देता येईल असे न्यायालयाचे मत आहे.

**ii)** त्यानंतर मी अभिलेखावर गंगाराम सोनारकर यांचे मृत्यूपत्र दाखल केले. सदर मृत्यूपत्र हे म्हसाळा येथील शेतीबाबत आहे. सदर मृत्यूपत्रामध्ये म्हसाळा येथील शेती मला आणि माझा भाऊ प्रतिवादी क्र.२ प्रेमसागर याला दिल्याबाबत आहे. त्यावर माझ्या वडीलांची सही व आंगठा आहे तसेच दोन साक्षदार रघुनाथ भुडे आणि पुरूषोत्तम रेवतकर यांच्या सह्या व आंगठे आहे. सदर दस्तऐवज हा नोंदनिकृत दस्त आहे त्यास **आर्टीकल ब** देण्यात आला.

**iii)** त्यानंतर मी अभिलेखावर फेरफार क्र.३४१ ची ऑनलाईन प्रत दाखल केली आहे त्यास **नि. क्र. ४५** देण्यात आला.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>प्रतिवादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपासासाठी पुढील तारिख ठेवण्यात आली.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि .२९.०९.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड